भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०३/२०१७

**१) संगनमतकरून अनोळखी ईसमानी पैस्याच्या वादावरून खुन केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/०३/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील ०३ अनोळखी आरोपी ईसमांनी मोटारसायकलने फिर्यादीचे पती माज घरात झोपले असता त्या तीन अनोळखी ईसमांनी फिर्यादीला तुझे पतीने आमचे कडुन विटा बनविण्यासाठी पैसे घेतले ते परत कर असे बोलले तेव्हा फिर्यादीने त्यांना पैसे न दिल्याने यातील तीन आरोपी अनोळखी ईसमांनी संगनमत करून फिर्यादीचे पती खुशाल पगाची कापगते वय ४० वर्ष रा. पारडी यास खाटेवरून बळजबरीने उचलुन गावाबाहेर नेले व दीड तासाने मृत स्थितीत माज घरातील खाटेवर आणुन ठेवले व निघुन गेले असे फिर्यादी उर्मिला खुशाल कापगते वय ३२ वर्ष रा. पारडी ता. लाखांदुर हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३०२,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. यादव पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत आरोपी अटक आहे.

**२) शासकीय कामात अडथळा निर्माण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ व मारपीठ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०३/२०१७ चे ०८.३० ते १०.०० वा. दरम्यान यातील आरोपीने ग्रामपंचायत बाम्पेवाडा येथे लेखी अर्ज देवुन दारूदुकान उघडण्याची परवानगी मागीतली असता ग्रामपंचायत बाम्पेवाडा येथे दि.२३/०२/२०१७ ला फिर्यादीने ग्राम सभेचे आयोजन करून दारूदुकान लावण्याबाबद ग्रामपंचायत ला नाहरकत देता येत नाही असे आरोपीस समजावुन सांगीतले असता ग्रामसभेचे ठरावाला न जुमानता दिनांक ०६/०३/२०१७ ला ग्रामपंचायत कार्यालय येथिल समोरील गेटला कुलुप लावुन त्याचे समोर बैलबंडी उभी करून अश्लिल शब्दात कविता लिहीलेले पोस्टर चिपकवुन फिर्यादीचे ग्रामपंचायत पदाअधिकाऱ्यासह कार्यालयात जात असता त्याना कार्यालय आपले नाही असे म्हणुन रस्ता अडवुन शासकीय कामात अळथळा आणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ थापड बुक्यांनी मारपीठ करून बदनामी कारक पोस्टर लावुन ग्रामपंचायत पदाधिकारी व अध्यक्ष यांची बदनामी केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५३,३३२,३४१,२९४,५०१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोळगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अंगनात बांधुन ठेवलेल्या शेळयाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०६/०३/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे घरासमोरील अंगनात बाधुन ठेवलेल्या ०७ शेळया पैकी ०३ शेळया प्रत्येकी २०००/—रू.असा एकुन किंमती ६०००/—रू.चा माल कोणीतरी अज्ञात चोराने शेळीच्या गडयातील दोर कापुन चोरुन नेल्याने फिर्यादी मुलचुद नत्थु नागरे वय ५७ वर्ष, रा. सातोना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रायपुरकर पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक ०६/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, सिहोरा, लाखांदुर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभटटी दारु, १८९० किलो ग्रॅम सडवा मोहा पास किंमती ९५,०००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.